# यवतमाळ नगर परिषद यवतमाळ

## अग्निशमन व आणीबाणी सेवा

ई.मेल–npyavatmal@gmail.com Phone no-07232-244265,244285

जा.क्र./नपय/अग्नि/02 /2021 दिनांक– 01 /04/2021

## अग्निशमन नुतनीकरण प्रमाणपत्र

प्रति,

कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड कॉम्पुटर सायन्स,
नारंगे नगर,धामणगाव रोड,यवतमाळ .

संदर्भः– १.आपला अर्ज प्राप्त दिनांक–०९/०३/२०२१ नुसार.
२.पोना कॉर्पोरेशन (लायसन्स एजन्सी) याचे फॉर्म बी व रिपोर्ट प्राप्त दिनांक–३१/०३/२०२१ नुसार

०००

प्रमाणीत करण्यात येते कि, **कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड कॉम्पुटर सायन्स,** नारंगे नगर,धामणगाव रोड,यवतमाळ. या शैक्षणीक इमारतीमध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व नियम २००९ या अधिनियमाअंतर्गत अग्निसुरक्षा उपाययोजना बाबत तपासणी करण्यात आली.तपासणीमध्ये संबंधीत ठिकाणी उपलब्ध असलेल्या अग्निसुरक्षा उपाययोजना कार्यान्वित आढळल्या.याबाबत लायसन्स अभिकरण PONA CORPORATION, MUMBAI [Lic.No.-MFS/LA-RF-388/RD-346/RP-081] यांनी पुरवठा केलेले **फॉर्म** 'B' व REPORT अन्वये खालील नमुद केलेल्या अटी व शर्तीवर अग्निशमन नुतनीकरण प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**A]** आगी विषयी कोणत्याही संबंधीत धोका किंवा अपघात होऊ नये याची खबरदारी घ्यावी. कोणतीही आपत्कालीन घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

**B]** संबंधीत ठिकाणी खालीलप्रमाणे आग प्रतिबंधक उपाययोजना सुरक्षेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या आहेत.

1. FIRE EXTINGUISHERS ABC 06 kg = 12 no.
2. FIRE EXTINGUISHERS ABC 04 kg = 02 no.
3. FIRE EXTINGUISHERS ABC 02 kg = 01 no.
4. FIRE HOSE REEL & HYDRANT VALVE = Provided.
5. FIRE SERVICE INLET = Provided.
6. HOSE BOX & HOSE PIPE = Provided.

**C]** संबंधीत ठिकाणी पाण्याची उपलब्धता ठेवण्याची जबाबदारी आपणावर राहिल.

**D]** सर्व विद्युत उपकरणे तपासुन घ्यावीत.विद्युत उपकरणांचा निष्काळजीपणे वापर करू नये.

**E]** संबंधीत शैक्षणीक इमारतीमध्ये काम करणारे व्यक्ती/कर्मचारी यांना आग विझविणे तसेच अग्निशमन उपकरण/यंत्रणेच्या वापराबाबत किमान प्राथमिक माहीती देण्यात यावी.त्यासाठी वेळोवेळी सराव घेण्यात यावा.

**F]** आपल्या इमारती/परिसरामध्ये ज्वलनशील पदार्थाचा साठा करू नये.

**G]** सदरहू ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने आपत्कालीन प्रसंगी तात्काळ मदतीसाठी सर्व महत्वाचे सेवांचे दुरध्वनी क्रमांक उदा. दवाखाना/पोलीस/अग्निशमन इ.ठळक अक्षरात सर्वांना दिसतील अशा प्रकारे लावावेत.

**H]** आपत्कालीन प्रसंगी धुरातुन रांगत मार्गक्रमण करावे.तसेच ओल्या कपडयाचे आवरण नाकावर ठेवून धुरापासुन बचाव करावा.

**I]** कागदपत्रे,कपाटे,रॅक्स व इतर ज्वलनशील पदार्थ इ. विद्युत स्विच बोर्डाला चिकटून ठेऊ नयेत.

**J]** अग्निशमन यंत्रणेची/उपकरणांची केव्हीही तपासणी करणे व तपासणीत अग्निशमन यंत्रणा/उपकरणे कार्यान्वीत आढळली नसल्यास सदरहु प्रमाणपत्र रद्द करण्याचा अधिकार अग्निशमन विभाग राखुन ठेवत आहे. तसेच वेळोवेळी अग्निशमन विभागास अग्निसुरक्षा उपाययोजनांच्या तपासणीसाठी सहकार्य करावे.

**K]** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ अन्वये वर्षातुन दोनदा **जानेवारी व जुलै** महिन्यामध्ये अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत व कार्यान्वित असल्याबाबतची तपासणी करून 'ब' प्रमाणपत्र लायसन्स अभिकरण/एजन्सी कडून घेवून अग्निशमन विभागाकडे सादर करावे.

उपरोक्त प्रमाणपत्र हे दि. 31 मार्च 2022 ........ पर्यंत वैद्य राहील.

(शिक्का: अग्निशमन विभाग न.प. यवतमाळ)

अग्निशमन अधिकारी
**अग्निशमन व आणीबाणी सेवा**
**नगर परिषद यवतमाळ**